माहिती हवीय?

संकेत जोशी, पुणे.

□ **आलोकनाथने कोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केलीय? नायिका कोण?**

– १९८७च्या *कामाग्नी*मध्ये आलोकनाथ नायक आणि टिना मुनीम त्याची नायिका होती.

रविकांत साखरे, जामखेड, कुंभारतळे.

□ ***नवराबायको, दूधभात, माझी जमीन, बेलभंडारा, वावटळ* आणि *स्त्री जन्मा ही तुझी कहाणी* या चित्रपटात सुलोचनाबाईंचा नायक कोण होता? दिग्दर्शक कोण?**

– *नवराबायको*त नायक दीपक, दिग्दर्शक बाळ गजबर, *दूधभात*मध्ये कर्वे नावाचा कोणी अभिनेता त्यांचा नायक होता, दिग्दर्शक राम गबाले. *माझी जमीन*मध्ये नायक कृष्णराव चोणकर, *बेलभंडारा*मध्ये नायक वसंत ठेंगडी, *माझी जमीन* आणि *बेलभंडारा*चे दिग्दर्शक अच्युत रानडे, *वावटळ* आणि *स्त्री जन्मा ही तुझी कहाणी*मधील सुलोचनाबाईंच्या भूमिका नायक विरहित होत्या. *वावटळ*चे दिग्दर्शक शांताराम आठवले आणि *स्त्री जन्मा ही तुझी कहाणी*चे दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी.

□ **हंसा वाडकरनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात भूमिका केल्या? त्या सध्या काय करतात.**

– *विजयची लग्ने, संत सखू, रामशास्त्री, लोकशाहीर, रामजोशी, संत जनाबाई, शिलंगनाचं सोनं, नवरा बायको, पुढचं पाऊल, सोन्याची लंका, वंशाचा दिवा, ही माझी लक्ष्मी, माया मच्छिंद्र तथा गोरखनाथ, पारिजातक* अर्थात *श्रीकृष्ण सत्यभामा, पाटलाचा पार, खेळ चालला नशिबाचा, रेशमाच्या गाठी, मी तुळस तुझ्या आंगणी, नायकिणीचा सज्जा, लोकशाहीर अनंतफंदी, मातेविना बाळ, सांगत्ये ऐका, मानिनी, रंगमंचमी, नार निर्मिते नरा, काय हो चमत्कार, ही नार रूपसुंदरी, श्रीमंत मेहुणा पाहिजे, धर्मकन्या* या मराठी चित्रपटात हंसा वाडकरनी भूमिका केल्या. आज त्या आपल्यात नाहीत. २३ ऑगस्ट १९७१ला त्यांचं निधन झालं.

अशोक परशुराम परब, ठाणे.

□ **महेश कोठारेने दुहेरी भूमिका केलेला चित्रपट कोणता?**

– *राजा और रंक* या हिंदी सिनेमात महेश कोठारे दुहेरी भूमिकेत चमकला.

सुकदेव दिवसे, नाशिक.

□ **संगीतकार एस. एन. त्रिपाठी यांनी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?**

– *श्री रामभरत हनुमान, वीर घटोत्कच श्री गणेश महिमा, हनुमान, पाताल विजय, जय महाकाली, लक्ष्मी नारायण, अल्लादिन और जादुई चिराग, भक्त पूरण, वीर अर्जुन, नवदुर्गा, दुर्गा पूजा, सल्तनत, गंगा मैय्या, चिराग ए. चीन, जय महादेव, महासती सावित्री, नवरात्री, वीर राजपुतानी, वसंत पंचमी, दसहेरा, दिल्ली दरबार, हातीमताई, इंद्रलीला, सती नागकन्या, नागमणी, नीलमणी, पवनपुत्र हनुमान, संत रघू, थीफ ऑफ सिंदबाद, वीर दुर्गादास, संगीत सम्राट तानसेन,* हे एस. एन. त्रिपाठींनी संगीतबद्ध केलेले ठळक चित्रपट.

भरत चंद्रकांत काळुवाला, माहिम कॉजवे.

□ **'एक मंजील राही दो...', 'दिल ले गयी चुलबुली नाजनी...', 'हमको तो जान से प्यारी है तुम्हारी आँखे...', 'चुडे में गजरा मत बांधो...', 'मैं ना भुलूंगा...' ही गाणी कोणत्या चित्रपटातील आहेत. त्यातील मुख्य कलाकार कोण?**

– 'एक मंजील राही दो...' चित्रपट *संजोग*, कलाकार प्रदीपकुमार, अनिता गुहा, शुभा खोटे ओमप्रकाश, राज मेहरा, लीला मिश्रा, पाछी, सुंदर, मेहमूद. 'दिल ले गयी चुलबुली नाजनी...' चित्रपट *लाटसाहब*, कलाकार शम्मी कपूर, नूतन, वेदना (अंजली कदम), ललिता पवार, राजेंद्रनाथ, ओमप्रकाश, मुराद, प्रेम चोप्रा. 'हमको तो जान से प्यारी है तुम्हारी आँखे...' चित्रपट *नैना*, कलाकार शशी कपूर, मौसमी चटर्जी, राजश्री, पद्मा खन्ना, आकाशदीप, रेहमान, डेव्हीड, संजना, ए. के. हंगल. 'चुडे में गजरा मत बांधो...' चित्रपट *धूपछांव*, या गाण्याची सुरुवात चुडे में अशी नाही. 'जुडे में...' अशी आहे. कलाकार संजीवकुमार, हेमामालिनी, योगिता बाली, ओम शिवपुरी, गजानन जागिरदार, नझीर हुसेन, बद्रीप्रसाद, रितू कमल, दिनेश हिंगो, कुमुद त्रिपाठी, डिम्पी निम्मी. 'मैं ना भुलूंगा...' चित्रपट *रोटी, कपडा और मकान*, कलाकार मनोजकुमार, शशी कपूर, अमिताभ बच्चन, झीनत अमन, मौसमी चटर्जी, सी.एम. दुबे, प्रेमनाथ.

□ **'मदन मोहनने किती चित्रपटांना संगीत दिलं? त्यांचा जन्म आणि मृत्यु कधी झाला?**

– मदनमोहन यांनी नव्वद एक चित्रपटांना संगीत दिलं. २५ जून १९२४ला त्यांचा जन्म झाला होता. १४ जुलै १९७५ला त्यांचा मृत्यू झाला.

प्रदीप बरबडे, यवतमाळ.

□ **स्वतःच्या नावाने चित्रपट निघण्याचा मान आतापर्यंत कोणत्या कलाकारांना मिळालाय?**

– स्वतःच्याच नावाने बनलेल्या चित्रपटांत ज्यांनी भूमिका केल्या त्या कलाकार आणि चित्रपटांची नावं याप्रमाणे:-

सुलोचना(सुलोचना रूबी मायर्स), *नरगीस*(नरगीस), मधुबाला(मधुबाला), *जॉनी वॉकर*(जॉनी वॉकर), *राजा गोसावीची गोष्ट*(राजा गोसावी), *जोहर इन बॉम्बे, जोहर इन काश्मीर*(आय. एस. जोहर), *जोहर मेहमूद इन गोवा, जोहर मेहमूद इन हाँगकाँग*(जोहर व मेहमूद), *चल रे लक्ष्या मुंबईला*(लक्ष्मीकांत बेर्डे), *पूनम*(पूनम ढिल्लाँ).

मानसी कोळेकर, ठाणे.

□ **हिंदीतील प्रसिद्ध अभिनेत्री पद्मिनी कोल्हापूरे यांनी किती मराठी चित्रपटांत अभिनय केला?**



*चिमणी पाखरं*मध्ये बालकलाकारांसह पद्मिनी कोल्हापूरे

– पद्मिनी कोल्हापूरे यांच्या सांगण्यानुसार त्यांना अनेक मराठी निर्मात्यांनी रोल ऑफर केला होता. पण काही ना काही अडचणींमुळे त्या मराठी सिनेमे करू शकल्या नाहीत. दोन वर्षांपूर्वी त्यांचा *चिमणी पाखरं* हा मराठी सिनेमा प्रदर्शित झाला होता.